'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF ) - 3.452(2015), (GIF)–0.676 (2013)
Issue No. 104 (A) : भारतीय बँकिंग क्षेत्र : समस्या आणि आव्हाने
UGC Approved Journal

ISSN : 2348-7143
January-2019

# माथाडी कामगांराचा चिकित्सक अभ्यास

दत्तात्रय सोपान घोडके
९९३०४६०५६६
dsghodke210414@gmail.com

**प्रस्तावना :**

मुंबई महाराष्ट्राची व भारताची आर्थिक राजधानी असून इतर शहरांच्या तुलनेत येथील लोकसंख्या अधिक आहे. अंदाजे ३ कोटी लोखसंख्येला अन्नधान्य, भाजीपाला, फळे इ.पुरवठा करण्यसाठी शासनाने कृषी उत्पन्न बाजार समित्याची स्थापना डॉकयार्ड रोड येथे केलेली होती. मुंबईची वाढवी लोखसंख्या आणि जागेचा तुटवडा पाहता महाराष्ट्र शासनाचे मुंबई कृषी उत्पन्न, बाजार समितीचे स्थलांतर तुर्भे, नवी मुंबई येथे १९७० च्या दशकात केली आहे. या कृषी उत्पन्न बाजाराचे क्षेत्र जवळपास ५०० एकर असून एवढया विस्तर्ण परिसरात धान्य बाजार, भजीपाला, मसाला, फळ बाजार, कांदा, बटाटा बाजार असे वेगवेगळे बाजार उभरले आहेत. या बाजारात शेतकरी, कृषी उत्पादन उत्पादक, व्यवसायिक, धान्य बाजार, भाजीपाला, मसाले, फळ बाजार, कांदा, बटाटा बाजार असे वेगवेगळे बाजार उभारले आहेत. या बाजारात शेतकरी, कृषी उत्पादन उत्पादक व्यवसायिक, घाऊक ग्राहक इत्यादी बरोबरच मालाची चढ– उतार करणारा माथाडी कामगार हा देखील महत्वाचा घटक आहे.

श्रम अर्थशास्त्रामध्ये कामगार म्हणजे असा व्यक्ती जो आर्थिक मोबदला मिळविण्यासाठी आपले शाररिक अथवा बौध्दिक श्रम करतो. माथाडी कामगार म्हणजेच असा कामगार जो अन्नधान्य, भाजीपाला, फळे इत्यादी मालाची चढ–उतार करतो. माथाडी कामगार म्हणजेच असा कामगार जो अन्नधान्य, भाजीपाला, फळे इत्यादी मालाची चढ–उतार करतो. इतर कामगारां प्रमाणेच माथाडी कामागार देखील पूर्वि असंघटीन होते. परंतू १९६० च्या दरम्यान मा. अण्णासाहेब पाटील यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र राज्य माथाडी कामगार सघटना स्थापन करण्यात आली. त्यानंतर १९६२ मध्ये महाराष्ट्र सरकारने माथाडी कामगार कायदा अमलात आणून माथाडी कामगारांना त्यांचे हक्क व कायदाप्रमाणे सेवा सुविधा देण्यात आल्या. आज संपूर्ण महाराष्ट्रात जवळपास ८०,००० माथाडी कामगार संघटीत असून मुंबई कृषी उत्पन्न बाजार समिती, तुर्भे, नवी मुंबई येथे अंदाजे ३०,००० माथाडी कामगार कार्यरत असल्याने दिसून येते. त्याचप्रमाणे यांना परवानापत्र देण्यात आले आहे. पुर्वी अशिक्षित व अर्धशिक्षित कामगार मोठया प्रमाणात होते. काळाच्या ओघात आज या बाजारामध्ये बारावी, पदवीधर कामगार देखील मोठया संख्येने दिसून येतात. पश्चिम महाराष्ट्रातील कामगारांचे प्रमाण या बाजारात देखील असल्याचे दिसून येते. त्याचप्रमाणे वेगवेगळया बाजारात यांचे वेगवेगळे गट कार्यरत असतांना दिसून येतात. याला टोळी असे संबोधले जाते.

तुर्भे येथील कृषी उत्पन्न बजारात अंदाजे रू ४ कोटीचे उत्पन्न या कामगारांना मिळते. थोडक्यात मुंबई कृषी उत्पन्न बाजारातील माथाडी कामगार हा देखील महत्वाचा घटक असून या माथाडी कामगारांच्या अर्थिक परिस्थितीचा अभ्यास होणे आवश्यक आहे.

**विषयाची निवड :**

कामगारांचे विविध क्षेत्रातील त्यांच्या कामावरून काही प्रकार पडतात. अन्नधान्य, भाजीपाला, फळे, इ. कृषी उत्पन्न बाजारामध्ये माथाडी कामगारांसारखा माथाडी कामगार कायदा सन १९६२ मध्ये केला. या कायदाद्वारे माथाडी कामगांराना वाजवी वेतन, कामाच्या वेळा, बोनस, कामगार परवाना पत्र, माथाडी कामगार हॉसीटल इ. सोयी उपलब्ध केल्या. तसेच माथाडी कामगारांसाठी नवी मुंबई मध्ये राहण्यासाठी घरे देखील

उपलब्ध करून दिली. या पाशर्वभूमीवर सरकारद्वारे मिळालेल्या सेवा सुविधांचा आढावा घेणे. माथाडी कामगारांची आर्थिक परिस्थिती अभ्यासणे महत्वाचे आहे.

**उद्दिष्टे :–**

१. माथाडी कामगांराचा चिकित्सक अभ्यास करणे.
२. माथाडी कामगारांची अर्थिकस्थिती अभ्यासणे.

**परिकल्पना :–**

१. कृषी उत्पन्न बाजारामध्ये माथाडी कामगारांची भुमिका महत्वाची आहे.
२. माथाडी कामगाराची आर्थिकस्थिती हलाखीची आहे.

**संशोधन पध्दती:**

प्रस्तुत विषय अध्ययनात द्वितीय स्त्रोत संशोधन पध्दतीचा वापर केला असून यामध्ये पुस्तके, कामगार संघटनेचे अहवाल, वृत्तपत्रे, नियतकालीके, इंटरनेटवरील माहिती इत्यादींचा वापर केला आहे.

**माथाडी कामगार :–**

आजच्या आधुनिक औद्योगिकीकरणाच्या काळात मोठया प्रमाणात बाजारपेठेमार्फत वस्तू व सेवांचे उत्पादन व त्याचे वितरण केले जाते. या उत्पादन व वितरणातील एक घटक म्हणजे माथाडी कामगार होय.

''विविध प्रकारचा माल किंवा जड वस्तु माथ्यावरून म्हणजेच डोक्यावरून वाहुन नेणाऱ्या व अशा प्रकारची इतरही अनुशांगिक कामे करण्याऱ्या अकुशल कामगारास माथाडी कामगार म्हणतात.''
मालाच्या वाहतुकीसाठी ते माथ्याबरोबरच पाठीचाही प्रामुख्याने वापर करतात. घाऊक व किरकोळ बाजार, वेगवेगळया प्रकारची गोदामे, रेल्वेतील मालधक्का, कृषी उत्पन्न बाजार समिती इत्यादी ठिकाणी ते वाहतुकीची कामे करतात. या माथाडी कामगारांना पुर्वी हमाल, घाटी किंवा गडी म्हणून संबोधले जात होते. तसेच अशिक्षित व ओझी उचलण्याची कामे करीत असल्यामुळे त्यांना व्यापारी व मालकाकडुन तुच्छतेची वागणूक दिली जात होती. माल वाहतुकीचे काम रोजच्या रोज मिळत नसे. तसेच मजुरी देखील कमी मिळत असे. त्यांना सामाजिक, आर्थिक अशी कोणतीच सुरक्षितता नव्हती. या कामगारांनी संघटीत होऊन आपल्या न्याय मागण्या मांडण्यास सुरूवात केल्यानंतर सन १९६२ पासून त्यांना श्री. अण्णासाहेब पाटील यानी ''माथाडी कामगार'' असे नाव दिले. माथाडी नावामुळे या कामगारांमध्ये आत्मसन्मानाची भावना निर्माण झाली. हमाल, गडी, घाटी या शब्दातुन येणारी तुच्छतेची भावना कमी झाली.

थोडक्यात 'माथा' म्हणजे डोके, डोक्यावरून माल वाहुन नेणारा कामगार म्हणजे माथाडी कामगार होय''.

**माथाडी कामगारांच्या कामाचे प्रकार :**

१. वाराई कामगार ट्रकमधील माल खाली करण्याच्या कामगाराला वाराई कामगार म्हणतात. वाराई कामगार ट्रकमधील माल दुसऱ्या हमालाच्या डोक्यावर किंवा खांद्यावर देतो.
२. वारफेर कामगारगोदामामधील माल त्याच गोदामात दुसऱ्या ठिकाणी हलविणे.
३. थापी मारणे गोदामात किंवा ट्रकमध्ये गोणी व्यवस्थित रचून थापी मारणे.
४. लोडिंग ट्रक, रेल्वे वॅगन किंवा कंटेनरमध्ये माल चढविणे.
५. अनलोडिंग ट्रक, रेल्वे वॅगन किंवा कंटेनरमधुन माल उतरविणे.

६. पालेवाली धान्य बाजारातील जमिनीवर पडलेल्या धान्याला गुजरातीत पाला म्हणतात.

७. या पाल्यामधुन धान्य निवडुन वेगळे करणाऱ्या महिला माथाडी कामगारांना पालेवाली म्हणतात.

याचबरोबर माल गोणीत भरल्यावर गोणी शिवणे, माल दुकाने किंवा गोदामातील माळयावर व पोटमाळयावर चढवणे व तेथुन उतरवणे, तळघरात साठवणूक असल्यास माल तळघरात घेणे व तेथुन परत आणणे इत्यादी कामे करावी लागत

**माथाडी कामगारांची तत्कालीन सामाजिक व आर्थिक परिस्थिती :**

ब्रिटीश काळात औद्योगिकिकीरणाला चालना मिळाली. भारतातला कच्चा माल जहाजाने इंग्लंडला घेऊन जाणे व त्यावर प्रक्रिया करून पक्का माल भारतीय बाजारपेठेत आणणे व यातुन नफा कमविणे हे ब्रिटीशांचे व्यापार धोरण होते. त्याकाळी युरोपियन देशांबरोबर व्यापार करण्यासाठी जलवाहतुक ही स्वस्त व प्रमुख मार्ग होता. तसेच देशातील प्रमुख बंदरे ब्रिटीशांच्या ताब्यात होती. मुंबई हे त्या पैकी एक ब्रिटीशांनी मुंबई शहर व मुंबई बंदर विकसित केले. अल्पावधीतच मुंबई बंदर ब्रिटीशांच्या व्यापाराचे प्रमुख केंद्र बनले. मुंबईमध्ये या मालाची चढ–उतार करण्यासाठी प्रामुख्याने गोदीमध्ये व व्यापाऱ्याच्या ठिकाणी माथाडी कामगार काम करीत. वाडी बंदर, दाना बंदर, भट बाजार, चिंच बंदर या परिसरात माथाडी कामगार हे मुंबईचे स्थानिक कामगार मात्र नव्हते. सातारा, सांगली, कोल्हापुर, पुणे, धुळे, अहमदनगर, जालना तसेच मराठवाडा इत्यादी जिल्हामधून हे कामगार मुंबईत येत असे. या कामगाराचे स्थलांतर केवळ आणि केवळ रोजगारासाठीचं होत. गावाकडे त्यावेळी पुरेशी शेती व इतर रोजगाराच साधन नसल्यामुळे कुटूंबाच पालन पोषण करण्यासाठी मुंबईत येत असत. बहुतांश कामगार हे निरक्षर होते. या कामगाराचे शरीरयष्टी मजबूत असल्यामुळे व कष्ट करण्याची तयारी असल्यामुळे ते कामाच्या शोधात मुंबईत येत होते. अगोदरच्या मित्र अथवा नातेवाईकांच्या मदतीने मिळेल ते हमालीचे काम, मिळेल त्या मजुरीवर करीत असत. बाजारपेठांमध्ये, कारखान्यात विविध प्रकारच्या वाहनात मालाची चढ–उतार करणे, मालाची ने–आण करणे असे माथाडी कामगारांच्या कामाचे स्वरूप असते. या कामासाठी शरीरयष्टी मजबूत असणे आवश्यक आहे. तसेच कौशल्यही आवश्यक असते.

कमीत कमी ताकदीचा वापर करून अनुभव कौशल्याच्या जोरावर मोठमोठी ओझी व जड वस्तु माथाडी कामगार वाहतात. माथाडी कामगारांना ग्रामीण पार्श्वभूमी आणि निरक्षरता यामुळे यांच्यात कुटूंब नियोजनाचा अभाव होता. बहुतांश कामगारांना चार ते पाच अपत्य तसेच एकत्र कुटूंब पध्दती यामुळे रोजगारासाठी गावी कुटूंब सोडून मुंबईमध्ये एकटे रहावे लागे. अशा परिस्थितीत माथाडी कामगार मुंबईमध्ये नातेवाईक, फुटपाथ, गोदाम यापैकी जेथे जागा मिळेल तेथे रहावे लागे. माथाडी कामगार कायदयापूर्वी माथाडी कामगारांना महिन्यामध्ये जेवढे दिवस काम मिळेल तेवढयाच दिवसांची मजुरी मिळत असे. बोनस किंवा इतर भत्ते याचा कोणताही लाभ या कामगारांना मिळत नव्हता.माथाडी कामगार हा प्रामुख्याने स्थलांतरीत कामगार असल्यामुळे हक्काची असे घरे त्यांना नव्हतीच. गोदामांमधील कमी प्रकाशात व कोंदट वातावरणात काम करावे लागे. गोदामांना खिडकी बहुतांश नव्हत्या. पिण्याचे पाणी, तसेच वैयक्तिक स्वच्छतेसाठी देखील जेवण करावे लागे. मालाच्या स्वरूपानुसार त्याचे वजन व कामाचे स्वरूप वेगवेगळे असे. लोखंडी बाजारातील कामगारांना लोखंडी सामानाची एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी ने–आण करावी लागत असे. धान्य बाजारात त्यावेळी १०० किलोच्या पोत्याचे वजन पाठीवर उचलून ट्रकमध्ये चढ–उतार करावे लागे. यामुळे या माथाडी कामगारांना अनेक शारिरीक व्याधींना सामोरे जावे लागे. शारिरीक आजारांसाठी त्यांना कसल्याही प्रकारची आरोग्यविशयक सेवा मालक व व्यापाऱ्यांकडुन मिळत नसे. तसेच कामामध्ये अपघात झाल्यास नुकसान भरपाई देखील दिली

जात नव्हती. याचाच अर्थ माथाडी कायदयापूर्वी हा कामगार असंघटित होता व त्याच्या असंघटीत पणाचा फायदा मालक व व्यापारी त्याचे आर्थिक शोषण करून घ्यायचे.

या बिकट आर्थिक परिस्थितीमुळे माथाडी कामगारांचे सर्वसाधारण जीवनमान हालाखीचे होते. काम करताना बहुतांश तत्कालीन हमाल बनीयन व हाफ पॅन्टवरच काम करायचे. कामाव्यतिरिक्त नेहमीचा पेहराव पायजमा व शर्ट असे. हातगाडी ओढणारा हमाल वगळता इतरांच्या पायात चपला देखील नसत.

**माथाडी कामगार चळवळ :**

मुंबईतील माथाडी कामगारांनी सन १९६० ते १९७० च्या दशकात एकत्र येवून राज्यशासनाकडे गोदी कामगारासाठीच्या, डॉक वर्कर्स रेग्युलेशन ऑफ एम्प्लॉयमेंट अॅक्ट या कायद्यासारखा माथाडी कामगारांसाठी स्वतंत्र कायदा करण्याची मागणी केली. शासनाकडे वारंवार पाठपुरावा करून महाराष्ट्र माथाडी हमाल व इतर श्रमजीवी कामगार नोकरीचे (नियमन व कल्याण) अधिनियम, १९६९ ही कायदा पारित करून घेतला. माथाडी कायद्यानुसार या कष्टकरी कामगारांसाठी कल्याणकारी मंडळे स्थापन करण्यात आली. या मंडळांच्या माध्यमातून या कामगारांना पुरेसे वेतन, नियमित व शाश्वत रोजगार, पगारी रजा, भविष्य निर्वाह निधी, उपदान व अन्य सोयी–सुविधा इत्यादी लाभ दिले जातात. यातून या हमाल माथाडी कामगारांना आर्थिक व सामाजिक स्थैर्य लाभले आहे. अनिश्चित, हीन दर्जाचे जीवन एकेकाळी जगणारा माथाडी कामगार या कायद्याच्या अमलबजावणीमुळे आज सन्मानाने जगत आहे.

महाराष्ट्र राज्य माथाडी, ट्रान्सपोर्ट आणि जनरल कामगार युनियन ही संघटना श्री. अण्णासाहेब पाटील यानी डिसेंबर १९६३ मध्ये नोंदणी क्र.४५९३/१९६२ अन्वये स्थापना केली. ही माथाडी कामगारांची पहिलीच संघटना होय. अधिनियमाच्या निर्मिती प्रक्रियेपासूनच या संघटनेने महत्वपूर्ण काम केलेले आहे. नंतरच्या काळात अनेक माथाडी संघटना स्थापन झाल्या आहेत. या विविध माथाडी कामगार संघटनांनी वेळोवेळी या चळवळीला महत्वपूर्ण योगदान दिलेले आहे.

लेव्हीच्या वापराची टक्केवारी

| अनुक्रमांक | बाब | किराणा बाजार व दुकाने मंडळ (टक्के) लेव्हीचा दर (४१ टक्के) | मल वाहतूक कामगार मंडळ(टक्के) लेव्हीचा दर (४० टक्के) |
|---|---|---|---|
| १ | भविष्यनिर्वाह निधी | १०.०० | १०.०० |
| २ | उपदान | ३.६७ | ३.५० |
| ३ | दिवाळी बोहनी | १४.५० | १४.५० |
| ४ | कामगार घरभाडे | २.०० | १.५० |
| ५ | रजेच्या काळातील कामगार प्रवास भत्ता | ०.६२ | १.०० |
| ६ | रजेचा भत्ता | ४.५० | ४.५० |
| ७ | हॉस्पिटल/वैद्यकिय सुविधा | २.०० | २.०० |
| ८ | भरपगारी रजा | ४.५० | ०.६५ |
| ९ | अपघात नुकसान भरपाई | ०.५० | ०.५० |
| १० | व्यवस्थापन खर्च | २.२१ | १.८५ |
| | एकूण | ४१.०० | ४०.०० |

स्रोत: www.shodhganga.com

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)–0.676 (2013)
Issue No. 104 (A) : भारतीय बँकिंग क्षेत्र : समस्या आणि आव्हाने
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
January-2019

**माथाडी कामगारांच्या घरांची समस्या**

गोदामात हमालीपासून इतर अनेक प्रकारची कष्टाची कामे करणाऱ्या माथाडी कामगारांना हक्काची घरे मिळण्यासाठी अनेक वर्षाच्या संघर्षानंतर राज्य सरकारने सन १९८८ मध्ये वडाळा आणि चेंबूर येथे ५८ एकर जमीन देण्याचा निर्णय घेतला. वडाळा येथे १६ एकर आणि चेंबूर येथे ४२ एकर असलेली ही जमीन माथाडी कामगार गृहनिर्माण संस्थांच्या ताब्यात येण्यास २००६ वर्ष उजाडले. माथाडींच्या दोन्ही युनियनच्या सामंजस्याने ५ लाख रूपयांत २७० चौरस फुटांची घरे देण्याचे निश्चित झाल्यानंतर माथाडी गृहनिर्माण संस्थांनी वैभव डेव्हल्पमेंट कॉर्पोरेशनला इमारतींचे बांधकाम करण्याचे कंत्राट दिले.

सन २००७ मध्ये वडाला येथे भूमीपूजन होऊन ५ ते ६ इमारतींचे बांधकाम सुरू झाले. या दरम्यान वडाळा येथील जमीन एमएमआरडीएच्या ताब्यात गेली. त्यामुळे प्राधिकरणाची परवानगी आणि नवीन आराखडयाचा प्रश्न उभा राहिला. राज्य सरकारने एमएमआरडीएकडून परवानगी घेऊन नवीन गृहनिर्माण प्रकल्पाचा आराखडा मंजूर केला. नव्या प्रकल्पासाठी सरकारने चार एफएसआय मंजूर केला आहे. नवीन आराखडयानुसार कामगारांना ८ लाख रूपयांत ५०० चौरस फुटांची (बिल्टअप) घरे देण्याचे निश्चित केले आहे. त्यामुळे २००७ मध्ये बांधलेल्या इमारती पाडून आता नव्याने इमारती बांधाव्या लागणार आहेत. माथाडी कामगारांच्या अ. भा. माथाडी ट्रान्सपोर्ट आणि जनरल कामगार युनियन व महाराष्ट्र राज्य माथाडी जनरल कामगार युनियन अशा दोन कामगार संघटना आहेत. या दोन युनियनच्या स्वतंत्र गृहनिर्माण संस्था आहेत. दोन्ही युनियनने एमएमआरडीएच्या नवीन आराखडयास मंजूरी न दिल्याने हा गृहप्रकल्प रखडल्याची माहिती सूत्रांनी दिली. घरासाठी अनेक कामगारांनी त्याच्या भविष्य निर्वाह निधीतून कर्ज काढले आहे. हे कर्ज जवळपास फिटत आले तरी अद्याप कामगारांच्या घराची वीट देखील रचली गेलेली नाही. विशेष म्हणजे या गृहप्रकल्पासाठी एका राष्ट्रीयीकृत बॅंकेने ३९ कोटी रूपये कर्ज मजूर केले आहे. मात्र, बांधकाम सुरू होत नसल्याने हे कर्ज उचलण्यात आले नाही.

**अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास कार्यक्रम**

अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ मर्यादीत मुंबई या महामंडाळाची स्थापना शासन दिनांक २७/११/१९९८ अन्वये करण्यात आलेली आहे. महाराष्ट्र राज्यात ज्या जाती जमातीसाठी स्वतंत्र महामंडळ अस्तित्वात नाही अशा आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाची संख्या लक्षात घेऊन या समाजातील सुशिक्षीत बेरोजगारांच्या आर्थिक उन्नतीचा मार्ग खुला करण्यासाठी, त्यांच्यासाठी स्वयंरोजगाराच्या योजना राबवून त्यात योणाऱ्या अडचणी दूर करणे, असा या महामंडळाचा उद्देश आहे. सदर महामंडळ हे कंपनी कायदा १९५६ अंतर्गत नोंदणीकृत आहे. तसेच माथाडी कामगार मंडळांच्या विविध पतसंस्थांकडून केला जातो.

**महामंडळात राबविली जाणारी बीज भांडवल कर्ज योजना**

या योजनेंतर्गत अर्जदारास ५ लाखापर्यंत गुंतवणूकीची प्रकल्प मर्यादा असलेल्या व्यवसायाकरिता अर्थसहाय्य उपलब्ध करून देण्यात येते. यामध्ये राष्ट्रीयकृत बॅंकेचा सहभाग ६० टक्के असून अर्जदारास ५ टक्के रक्कम स्वत:चा सहभाग म्हणून भरावयाची आहे. राष्ट्रीयकृत बॅंकांनी मंजूर केलेल्या प्रकल्प रक्कमेच्या ३५ टक्के रक्कम महामंडळामार्फत बीजभांडवल म्हणून देण्यात येते. सदर ३५ टक्के रक्कमेवर द.सा.द.शे. ४ टक्के व्याज आकारण्यात येते. बीज भांडवल कर्ज योजनेच्या परतफेडीचा कालावधी ५ वर्षाचा असून बॅंकेने कर्ज वितरीत केल्यानंतर त्वरीत दुसऱ्या महिन्यापासून महामंडळाच्या बीज भांडवलाची वसूली सुरू केली जाते.

अर्थात असे असले तरी उत्पनाचे स्त्रोत मर्यादित असल्यामुळे बॅंका, पतसंस्थ व महामंडळाचा लाभ सर्वांनाच घेता येत नाही. माथाडी कामगारांचें आर्थिक, सामाजिक आणि कौटुंबिक जीवनमान निकृष्ट दर्जाचे होते महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार अधिनीयम, १९६९ मुळे त्यांना आरोग्य विषयक सुविधा व सेवानिवृत्ती नंतरची सुरक्षितता मिळाली परंतु अजूनही मोठया प्रमाणात माथाडी कामगार वंचित असल्याचे दिसते.

संदर्भ सूची:–

१. श्री. साबळे, यशोगाथा
२. डॉ. हनुमंत पाटील, दि ग्रेट माथाडी .
३. आट्टावळकर, श्रमाचे अर्थशास्त्र, प्राची पकाशन
४. पदिप आगलावे, संशोधन पध्दती शास्त्रे व तंत्रे, विद्या प्रकाशन, नागपूर
५. राम दंशमुख, मुलभुत सांख्यीकीय तंत्रे, विद्या प्रकाशन, नागपूर
६. Kothari, Research Methodology western limited, Delhi
७. Datt R& Sundaram K.P.M (2007) Indian Economy, S. Chand Company, New Delhi.
८. Ahujaram (2001) Research Methodology, Rawat Publication Jaipur
९. .shodhganga.com
१०.रसाळ राजेंद्र २०१० भारतीय अर्थ व्यव्स्था, सक्सेस प्रकाशन पुणे,
११.इंदुलकर कल्याण, २००७, अर्थशास्त्र आध्यापन पध्दती विदया प्रकाशन नागपुर